# आली दिवाळी दिवाळी, अंगणात गं  रांगोळी...

दिवाळी अन् रांगोळी हे नातं अतूट आहे. भल्या पहाटे अंगण झाडायचे, सडा टाकायचा, ठिपके काढायचे, ते जोडायचे नि मग त्यात रंग भरायचे. नि मग दिवसभर जाणाऱ्या येणाऱ्याने केलेले त्या रांगोळीचे कौतुक अलगद झेलायचे. अशी रांगोळी फक्त महाराष्ट्रातच काढतात, ही तेव्हाची समजूत. मग वाटलं पूर्ण भारतभर बायका अशाच रांगोळ्या काढत असाव्यात. मग ओळख झाली दक्षिणेतील कोलमची. जरा किचकटच वाटला प्रकार. ठिपके जोडायच्या ऐवजी त्याभोवती रेघ काढायची. रवीवार, सोमवार अशा आठवड्यातल्या प्रत्येक दिवशी वेगळी रांगोळी काढायची. उत्तरेतल्या रांगोळ्या अगदी अलिकडे अलिकडे बघितल्या. बिनठिपक्यांच्या. वर्तुळाकार. क्वचित् चौकोनी वा त्रिकोणी आकारात. सोळा संस्कारांच्या निमित्ताने काढायच्या. लग्न, मुंज, बारसं, डोहाळजेवण वगैरे वगैरे. होळी, मॉन्सून अशा प्रसंगीपण विशिष्ट रेखाटन.

दक्षिणेत वापरतात तांदळाची पिठी तर महाराष्ट्रात शिरगोळ्याची पावडर. गुजराथेत मोठ्या रंगीबेरंगी कापडावरच रांगोळ्यांच्या डिझाइनचे तुकडे शिवून अंगणात पसरायची पध्दत तर बंगालमध्ये कापडाची चिंधी तांदळाच्या पिठीच्या पाण्यातल्या मिश्रणात बुडवून तिने रेखाटण्याची पध्दत. आंध्रमध्ये बोटांच्या बेचक्यात तीन चार रंगीत खडूच धरून समांतर रेघांनी ती रेखाटायची. केरळात फुलांनी सजवायची पध्दत. भारतभरच्या बायकांच्या हौसेला अन् कलात्मकतेला जोड नाही. ज्या देशी जे माध्यम मिळेल ते त्या वापरतील. पण रांगोळी रेखाटत रहातील. उगीच कुरकूर करणार नाहीत.

त्याला जोड मिळाली ती रांगोळीशी जोडलेल्या आख्यायिकांची. दंतकथांची. अंधश्रध्दांची. म्हणे राजस्थानात एक नवी सासुरवाशीण दिवाळीत लक्ष्मीपूजनासाठी लक्ष्मीची पावलं काढत होती. तो तिला दिसली साक्षात् लक्ष्मी घरात शिरतांना. हात जोडून सासुरवाशीण तिची विनवणी करते. "बाई लक्ष्मी आम्हास सोडून तू कधी जाऊ नको." "नाही जात." देवी लक्ष्मी तिला आश्वासन देते. "पण एका अटीवर. जोपर्यंत तू रांगोळी काढत राहशील. तोपर्यंत मी तुझ्या घरात वास करीन." मग ती सासुरवाशीण रात्रभर रांगोळी काढत रहाते. आशेने. देवी लक्ष्मीला आपल्या घरात बंदिस्त करण्याच्या अभिलाषेने.  अशीच एक सासुरवाशीण सासूसासऱ्यांच्या, पतीच्या कोपास पात्र झाली. त्यांनी  ठेवली तिला गोठ्यात. गाय वासरात. बिचारी वेळ जावा म्हणून गोठ्यातच रांगोळी काढत बसली. तिची कला बघून सर्व झाले खूष. मग ती रोजच रांगोळी काढू लागली. उंबऱ्यावर. तुळशीवृंदावनापुढे. देवासमोर. गोठयात. सारवलेल्या चुलीवर, शेगडीवर. घरातल्या सर्वांना खूष ठेवण्यासाठी. त्यांची मर्जी राखण्यासाठी.

राजस्थानात हा प्रकार तर तिकडे मथुरेतून अक्रूर कृष्णाला घेऊन जातो. तर त्या गोपी त्याच्या विरहाने व्याकूळ होतात. हवालदील होतात. कृष्ण विरहाच अनिवार दुःख त्या रांगोळी रेखाटून कसबसं विसरायचा प्रयत्न करतात. इंद्रियासी दमुनि चित्ताला वळविले..तशापैकीच गत. शेवटी रांगोळी काढण्याच्या प्रक्रियेतून कृष्णाच्या सहवासाच सुख अनुभवतात. समाधिस्थ होतात. परदेशी वा देवाघरी गेलेल्या आपल्या पतीच्या विरहाच दुःखही बायका असच रांगोळी काढून शमवायचा प्रयत्न करत असाव्यात.

असे म्हणतात की जनक राजा त्याच्या कन्येला, जानकीला आपल्या महालासमोर रांगोळ्या काढून त्या नवरत्नाने सजवायला सांगत असे. तिला प्रोत्साहन देण्यासाठी स्वतः जातीने पहात उभा रहात असे. असेही म्हणतात की लक्ष्मणाने सीतेला कुटीबाहेर जी रेघ काढून ती न ओलांडायची तिच्यावर जबाबदारी टाकली होती, त्यातूनच स्वसंरक्षणाखातर उंबऱ्यावर रांगोळी काढण्याची प्रथा सुरू झाली असावी. कर्नाटकात एक कोडे घालतात. कोण्या एका पर्वतावर एक चांदीची काठी ठेवली आहे. ती ठेवायला माणसे आहेत पण ती उचलायला माणसे नाहीत. ती म्हणजे उंबऱ्यावरची रांगोळी.

रोज नवनवीन रांगोळ्या काढण्यातली सृजनशीलता वेगळी अन् ही रांगोळीला जोडलेल्या आख्यायिका रचण्यातली कल्पनाशक्ती आगळी.

कर्नाटकातल्या भागवताच्या एक आवृत्तीत कृष्णाने सुभद्रेला सांगितलेल्या व्रताची कथा आहे. एक शहरात– बहुधा ती द्वारका असावी–जिथे श्रीकृष्णाचा मोठा भाऊ बलराम राज्य करीत असे. तिथे दर एकादशीला ढोल, ताशे वाजवण्याची प्रथा होती. एकदा त्या ढोलाचे कातडे फाटलेले व बडवायच्या काठया मोडलेल्या आढळल्या. तेव्हा राजाने हुकुम

सोडला. जी स्त्री रोज शंख, चक्र, गदा, गोपद्म काढायचा नियम पाळत नाही अशा स्त्रीच्या पाठीचे कातडे सोलून त्याने तो ढोल दुरुस्त करावा व तिच्याच हाडांच्या काठ्या बनवून तो वाजवावा. शोधाअंती असे आढळून आले की तुळशीदेवी, चंद्रादेवी, तारादेवी वगैरे स्त्रियांनी तो नियम पाळला होता. परंतू श्रीकृष्णाची धाकटी बहीण सुभद्रा हिनेच रांगोळी काढली नव्हती. म्हणून तिच्या पाठीचे कातडे सोलण्याची व हाडांच्या काठया बनवायची आज्ञा देण्यात आली. आपल्या प्रीय भगिनीचे प्राण वाचवण्यासाठी श्रीकृष्णाने तातडीने आपल्या वाहनावरून-गरुडावर आरूढ होऊन सुभद्रेच्या महाली प्रयाण केले. आपल्या लाडक्या भावास पाहून सुभद्रेस मोठा संतोष झाला. त्याच्या स्वागतार्थ तिने त्याला चौरंगावर बसवले व  स्फटिकाच्या घंगाळ्यात गरम पाणी आणले. त्याने त्याचे पाय धुतले व स्वतःच्या पदराने ते पुसले. तिने विचारलेन, "दादा तू आम्हास भेटायला क्वचितच येतोस. एवढ्या घाईने आज कसं काय येणं झालं?"

त्यावर श्रीकृष्ण उत्तरले, "ताई, आता तुला फार मोठी शिक्षा होणार आहे. त्यातून तुला वाचवण्यासाठी मी तातडीने इकडे आलो. ती शिक्षा तुला होऊ नये म्हणून मी योग्य तो उपाय सांगतो." सुभद्रा हंसून म्हणाली, "काय सांगतोस दादा? तुझ्यासारखा भाऊ, अर्जुनासारखा पति, वसुदेव-देवकीसारखे माता पिता आणि अभिमन्यूसारखा पुत्र मला असतानासुध्दा मीही काही रीतीरिवाज पाळायला हवेत म्हणतोस? तसेच असेल तर सांग मी काय करायला हवे ते." त्यावर भगवान् श्रीकृष्ण म्हणाले, "ताई, या राज्याचा नियम तुला माहीत नाही. दररोज शंख , चक्र, गोपद्म काढायच व्रत जी कोण स्त्री पाळत नाही तिच्या पाठीचे कातडे ढोलासाठी वापरतात. तिच्या हाडांच्या काठया करून तो बडवला जातो." सुभद्रा घाबरून त्याला म्हणाली, "आता माझ्यावर ओढवलेल्या या आपत्तीवर मात कशी करायची तेवढं मला सांग."

श्रीकृष्णाने तिला सुचवले की तिने रोज तिच्या महालापुढचं अंगण स्वच्छ करून, ते शेणाने सारवून त्यावर स्वस्तिक, शंख, चक्र, गदा, पद्म, गोपद्मे , पाने, फुले, ऊस वगैरेची चित्रे काढून मग ती सोन्या चांदीच्या वर्खाने व मौल्यवान नवरत्नांनी सजवावीत. गायीच्या चित्रावर तिच्या पोटावर तेहतीस कमळे काढावीत. मग या रांगोळीभोवती तिने तेहतीस प्रदक्षिणा घालाव्यात व वाकून नमस्कार करावा. अशा तऱ्हेने श्रीकृष्णाने सुभद्रेला रांगोळीचे महत्व असलेली प्रथा शिकवली. "तुझ्या चुकीचे परिणाम तुला या रांगोळी काढण्याच्या व्रताने भोगावे लागणार नाहीत व तुला शिक्षाही होणार नाही." अशा प्रकारे रांगोळी ही मंत्रशक्ती असलेली पवित्र कला मानली जाते.

म्हणून भारतीय बायका रांगोळी काढतच राहिल्या. आपल्या लेकी सुनांना शिकवत राहिल्या. मनातल्या थोडया भीतीमुळे, थोडया आशेमुळे. अभिलाषेमुळे. नकळत लागलेल्या संवयीमुळे. वडिलधाऱ्यांनी लावलेल्या शिस्तीमुळे. पाठ थोपटून घेण्यासाठी. कौतुक करून घेण्यासाठी. कुणाच्या का आरवण्याने होईना, पण सूर्य उगवल्याशी कारण.. तशापैकी. म्हणूनच भारतीय रांगोळी कला शेकडो वर्षांनंतर आजही अजरामर राहिली.

---

'रांगोळी –एक पुनर्विचार' या पुस्तकातील काही भाग.

माधुरी बापट
१६६६ साऊथ कॅक्टस रेन लेन
थॅचर ॲरिझोना ८५५५२
durga1950@hotmail.com